# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/औबाद /५१४ /२०१४/३५

तक्रार दाखल दिनांक ;- १५/०७/२०१४
निकाल दिनांक ;- ०६/०९/२०१४

सौ. कुसुम लालचंद मोरे तक्रारदार
मु.पोस्ट.पडेगांव , प्लॉट नंबर २३,
न्यु नंदनवन कॉलनी, औरंगाबाद .

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
शहरी विभाग, औरंगाबाद

गैरअर्जदार क्रमांक १

जी.टी.एल. -

गैरअर्जदार क्रमांक २

मंच सदस्य

डॉ. भास्कर गो.पालवे, अध्यक्ष
श्री. विलासचंद्र . सु. काबरा सदस्य

# निर्णय

अर्जदाराने ग्राहक ग्रा-हाणे निवारण मंचासमोर अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनीयम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत दिनांक १५.०७.२०१४ रोजी तक्रार दाखल केली आहे.

ग्राहकांने घरगुती वापरासाठी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी कडून सिंगल फेज कनेक्शन दिनांक ०७.१०.१९९९ पासुन घेतले आहे त्यांचा ग्राहक क्रमांक ४९०९१०२६७५३९ असा आहे माहे मे २०१२ या महिन्याचे चुकीचे एकत्रित युनिट १९२९ चे रुपये १८,७१६,८६ चे बिल देण्यात आले. त्यामुळे सदर बिलाचा भरणा केला नाही. या बिलाच्या दुरुस्तीसाठी अर्जदाराने गैरअर्जदाराचे संबधित अधिकारी / कर्मचारी यांच्याकडे वेळोवेळी लेखी / तोंडी तक्रार केली परंतु अदयापी या विज बिलाची सुधारत प्रत मिळाली नाही या बिलाचे अगोदर डिसेंबर २०११ पासुन मिटरवर फॉल्टी साईन असे दाखविण्यात आले होते. म्हणजे बिलाची १९२९ युनिटची विभागुन आकारणी करण्यात आलेली नाही . ग्राहकाने मे २०१२ या महिन्याचे एकत्रित युनिट १९२९ ची विभागणी करुन , भरणा केलेले पैसे वजा करावे , चुकीचे बिल दुरुस्त करुन सुधारीत बिल देण्यात यावे. तसेच त्यावरील व्याज व दंड माफ करावा , सदर घटनेमुळे झालेल्या मानसिक त्रासामुळे अर्जदारास गैरअर्जदार क्रमांक २ ( जी.टी.एल.लि. ) यांनी रुपये ५००/- भरपाई दयावी.

वरील तक्रारीची सुनावणी दिनांक ३०.०७.२०१४ , ०५.०८.२०१४ , १२.०८.२०१४ व २६.०८.२०१४ रोजी घेण्यात आली. चौकशीच्या दरम्यान नोडल अधिकारी श्री. शेवाळे, महावितरण व श्री . वेजरे, जी.टी.एल.ली. व ग्राहक प्रतिनिधी श्री. मोरे ( अर्जदार ) व अर्जदाराचे ( ग्राहक ) चे प्रतिनिधी श्री भाऊराव महादू बागुल या प्रतिनिधीनी आपली तक्रार वरीलप्रमाणे कथन केली .गैरअर्जदार क्रमांक १ ( महावितरण ) नोडल अधिकारी, महावितरण, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या दिनांक ३०.०७.२०१४ च्या लेखी म्हणण्यानुसार दि. ०१.०५.२०११ पासुन औरंगाबाद शहर विभागाचे विज वितरण गैरअर्जदार कमांक २ ( जि.टी.एल.ली.चिकलठाणा, औरंगाबाद ) यांचेकडे हस्तांतर करण्यात आले आहे . सदर तक्रारीवर नियमानुसार कार्यवाही करण्यास गैरअर्जदार क्रमांक २ यांना कळविण्यात येईल असे म्हटले आहे. सुनावणी दरम्यान गैरअर्जदार क्रमांक २ ( जी.टी.एल.ली. ) चिकलठाणा, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी श्री. वेजरे, यांनी आपले म्हणणे लेखी दिनांक ०५.०८.२०१४ रोजी सादर केले. ग्राहकाचे मीटर दोषयुक्त असल्याचे मान्य केले . अर्जदारास डिसेंबर २०११ ते एप्रिल २०१२ या काळात

चुकीचे बिल आकारण्याचे मान्य केले. सदरहू  दोष मे २०१२ मध्ये काढण्यात आले या संबधीची  तक्रार ग्राहकाने प्रथमता २८.०६.२०१२ रोजी करण्यात आली ,

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निरीक्षण</u>**

दोन्ही बाजुकडून दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की विज ग्राहकांस माहे डिसेंबर २०११ ते एप्रिल २०१२ या काळात चुकीचे बिल देण्यात आले. मीटर मधील दोष मे  २०१२ मध्ये करण्यात आला. दुरुस्त केलेल्या बिलाचे क्रेडीट देण्यास ऑगस्ट  २०१२ व नोव्हेबंर २०१३ पर्यन्त विलंब झाला. म.रा.विज नियामक आयोग  २००५ चे कलम  १५.३.१ नुसार ग्राहकाचे मीटर रिडींग प्राप्त न झाल्यास सरासरी पध्दतीने आकारणी करण्याची सवलत फक्त दोनदा दिलेली आहे. त्यानंतर मात्र कंपनीने ग्राहकास मीटर रिडींगनुसार विज बिल दिले पाहिजे. घरगुती विज ग्राहकाचे दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधीमध्ये मीटर रिडींग न घेतल्यास आयोगाचे कृति व मानकानुसार विज पुरवठादारावर दंडाची तरतुद केली आहे. सदर प्रकरणात ग्राहकाचे सी.पी.एल नुसार त्याचे मिटर रिंडीग नियमीतपणे होत नसल्याचे दिसुन येत आहे . त्याचप्रमाणे ग्राहकाच्या तक्रारीचे निवारण देखील वेळेवर होत नसल्याचे  स्पष्ट  होत आहे. त्यामुळे सदरहू सेवा दोषपूर्ण असून ग्राहक नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१ ) जी.टी.एल.लि. औरंगाबाद कंपनीने माहे मे  २०१२ चे एकत्रित  १९२९ युनिटचे विभागणी करुन सुधारीत बिल देण्यात यावे त्यावरील व्याज व दंड माफ करावा. भरणा केलेली रक्कम वजा करावी

२ ) नियमीतपणे  मीटर रिंडीग न घेता ग्राहकास दिलेल्या दोषपूर्ण सेवेबाबत व झालेल्या मानसिक  त्रासापोटी रुपये ५००/- नुकसान भरपाई जी.टी.एल.लि. औरंगाबाद यांनी सौ.कुसुम लालचंद मोरे यांना देण्यात यावी.

३ ) केलेल्या कार्यावाहीचा अनुपालन अहवाल  ३० दिवसाचे आत मंचास सादर करावा.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरित** | **स्वाक्षरित** |
| **डॉ. भास्कर गो.पालवे,** | **श्री. विलासचंद्र . सु. काबरा** |
| **अध्यक्ष** | **सदस्य** |